**<u>नि. फौ. खटला क्र.११५/२०२४</u>**

**<u>निशाणी क्र.२३</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

| | | |
|---|---|---|
| **<u>माझे नांव</u>** | : | लक्ष्मण माधवराव देवंग्रे, |
| **<u>वय</u>** | : | २७ वर्षे, **<u>काम</u>** : लॅब टेक्निशियन, |
| **<u>राहणार</u>** | : | तळेगाव, ता. देवणी, जि. लातूर. |

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

दि.३०/१०/२०२४ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० वाजताच्या दरम्यान कवठाळा येथे बोलावले होते. तेथे पोलीस लामतुरे, परमेश्वर पांचाळ आणि दत्तात्रय निडबने हे हजर होते. परमेश्वर पांचाळ यांनी घटनास्थळ दाखवले होते. सदर घटनास्थळ कवठाळा–वलांडी रोडलगत उत्तरेला २०० फूट अंतरावर होते. पोलिसांनी तेथे पंचनामा केला परंतु काहीही वस्तू सापडली नाही. आता मला पंचनामा दाखविला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२४** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. पाटील यांच्यामार्फत ::</u>**

०२. मला घटनास्थळाच्या आजूबाजूच्या सर्वे नंबरबाबत सांगता येत नाही. घटनास्थळ कोणत्या सर्वे नंबरमध्ये होते हे मला सांगता येत नाही. आरोपी आणि फिर्यादी यांची कोणत्या गटामध्ये किती शेती आहे हे मला सांगता येत नाही. मला नमूद गुन्ह्याचा क्रमांक किंवा कलम सांगता येत नाही. आरोपीविरुध्द कोणी केस दाखल केली हे मला माहीत नाही. आरोपींची नावे मला सांगता येत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी मोहनेश्वर पांचाळ सोबत न्यायालयामध्ये आलो. मला पंचनामा कशाचा होता आणि त्यामधील मजकूर सांगता येतो. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो होतो, पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीला मदत

होण्यासाठी त्याच्या सांगण्याप्रमाणे खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत                सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.२२/०४/२०२६.